# महिला व बाल कल्याण विभाग
# जिल्हा परिषद वाशिम

# पर्यवेक्षिका संवर्गाचे सर्वसाधारण
# स्थानांतरण बाबत इतिवृत्त
# सन २०२०

**महिला व बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद वाशिम**

**महिला व बाल कल्याण विभाग अंतर्गत संवर्ग निहाय प्रशासकिय व विनंती नुसार समुपदेशनाने करावयाचे स्थानांतर बाबत सभेचे इतीवृत्त दिनांक ७/८/२०२०**

जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत बदल्यांचे प्रक्रीये करीता वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ४/५/२०२० मधिल मु.क्र. १५ नुसार कारोना महामारीच्या अनुषंगाणे करण्यात आलेल्या विविध विभागा अंतर्गतच्या उपाययोजने मध्ये सातत्य राखणे गरजेचे आहे हि बाब लक्षात घेवून चालु वित्तीय वर्षात कोणत्याही संवर्गाची अधिकारी / कर्मचारी यांच्या बदल्या करण्यात येवू नये या अनुषंगाणे सविस्तर आदेश समान्य प्रशासन विभागा मार्फत देण्यात येत आहे असे नमुद आहे. ग्राम विकास विभाग यांचे पत्र दिनांक ७/७/२० अन्वये राज्यातील सर्व जि.प. मधिल सर्व पदाना शासन निर्णय दिनांक ४ मे २०२० मधिल आदेश लागु असल्याने त्याची काटेकोर अमलबजावणी करावी असे निदेर्श आहे.

ग्राम विकास विभाग यांचे पत्र दिनांक ९/७/२० चे निदेशानुसार वित्तीय वर्षात ३१ मे २०२० पर्यत करावयाच्या सर्वसाधारण बदल्या या दिनांक ३१ जुलै २०२० पर्यत करण्यात याव्यात असे निदेर्श आहेत.त्याच प्रमाणे शासन निर्णय दि. १५ मे २०१४ च्या शासन निर्णयातील तरतुदी नुसार तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या दि.७/७/२०२० च्या शासन निर्णयात नमुद करण्यात आलेल्या कालावधीत व १५ टक्के मर्यादेत करण्यात याव्यात असे निदेश आहेत.ग्राम विकास विभागाचे पत्र दिनांक ३१/७/२०२० नुसार वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मच्या-यंच्या बदल्यास १० ऑगष्ट पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाणे या कार्यालयाचे पत्र क्र. २१५४ दिनांक ३१/७/२०२० नुसार जिल्हा स्तरावरील सर्वसाधारण बदली प्रकीया - २०२० ही दिनांक ७/०८/२०२० रोजी घेण्याकरीता मानाता प्रदान करण्यात आली असुन दिनांक ७/८/२०२० रोजी जिल्हा स्तरावरील सर्व विभागाच्या प्रशासकीय/विनंती/आपसी बदल्यांचे समुपदेशनाने घेण्यात योणार असल्या बाबत कळविण्यात आले.

तथापी सद्यस्थितीत वाशिम जिल्हामध्ये कारोना विषाणुचा प्रसार झाला असुन त्यामुळे आरोग्य विषय गंभिर परिनाम दिसुन आले असल्यामुळे विविध संवर्गातील बदलीस पात्र असलेल्या कर्मचा-यांना ऑन लाईन पध्दतीने समुपदेशन प्रक्रीयेस राबविण्यात येवूने Google Meet व्दारे समुपदेशनान घेण्यात आले.

शासनाचे निर्णय क्रमांक जिपब-४१४ / प्र.क्र ११२ / आस्था-१४ ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई ३२ दिनांक १५ मे २०१४ , क्रमांक प्र.क्र. १३८ / आस्था-१४ ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई ३२ दिनांक २२ एप्रिल २०१६ , शासन निर्णय क्र.जिपब/४८१७ / प्र.क्र.२२८/ आस्था-१४ दिनांक ७ मार्च २०१९, कक्ष अधिकारी महा.शासन यांचे पत्र क्र. जिपब-४८१९/प्र.क्र.२७२/आस्था-१४ दिनांक २७/५/२०१९ अन्वये प्रशासकिय व विनंती वरुन बदल्या करणे करीता नमुद करण्यात आल्या नुसार महिला व बाल कल्याण विभाग जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत दिनांक ७/८/२०२० रोजी सकाळी १०.०० वाज**ता मा.अध्यक्षा जि.प.वाशिम, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वाशिम , मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.वाशिम, जि.प.** चे सर्व अधिकारी, विभाग प्रमुख व ईतर कर्मचारी तसेच प्रशासकिय व विनंती वरुन बदल्याचे पात्र कर्मचाऱ्यांची समुदपदेशनाने बदली प्रक्रीया Google Meet व्दारे जिल्हा परिषद मध्ये घेण्यात आली.

**समुपदेशनाने करावयाच्या स्थानांतरा बाबत खालील प्रमाणे सुचना करण्यात आल्यात.**

- प्रशासकिय बदल्या प्रथम करण्यात येतील.
- प्रशासकिय बदल्या साठी पात्र कर्मचाऱ्यांची यादी या पुर्वी प्रकाशीत करण्यात आली आहे, त्यानुसार सबंधीत कर्मचाऱ्यांनी जेष्ठता यादीमध्ये काही दुरुस्ती असल्यास सुचविण्यात आल्या आहेत.
- शासन निर्णय क्रमांक जिपब- ४१४ / प्र.क्र १२२ / आस्था-१४ ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई ३२ दिनांक १५ मे २०१४ व दि.७ मार्च २०१९, अन्वये जे कर्मचारी अपंग आहेत त्यांची माहिती घेण्यात आली व ते कर्मचारी मतीमंद व्यक्तीचे अथवा मतीमंद मुलाचे पालक आहेत अशाकर्मचाऱ्यांची माहिती घेण्यात आली. तसेच प्रशासकिय कारणावरुन बदल्या प्रकरण १ मधिल ३(अ),(ब),(क),(ख)(ग)(घ) ४ (१ते५) व (४) चे जेष्ठते क्रमानुसार प्राधान्या बाबत ची माहिती घेण्यात आली.
- कुमारीका, विधवा , परित्यक्त्या असणाऱ्या स्त्रीकर्मचारी व गंभीर आजाराने ग्रस्त असणारे कर्मचारीयां ंचे पसंती चे ठिकाणा बाबत विचारणा करण्यात आली.

उपरोक्तनुसार जे बदली पात्र कर्मचारी आहे, त्या सर्व कर्मचाऱ्यांची जागा रिक्त दाखविण्यात आल्या, तसेच यापुर्वी रिक्त असलेल्या जागा सुध्दा रिक्त दाखविण्यातआल्या.

- त्यानंतर प्रशासकिय बदलीच्या यादी ची विकल्पानुसार अनु.क्र.१ नुसार प्रकरण ११ मधिल ३ (अ),(ब),(क),(ख)(ग)(घ) ४ (१ते५) व (४) जेष्ठते क्रमा नुसार प्राधान्या बाबतची माहिती घेण्यात आली.

**तसेच विनंती नुसार कर्मचाऱ्यांच्या स्थानांतरा बाबत खालील सुचना देण्यात आल्या.**

- विनंती वरुन कर्मचाऱ्याची यादी प्रसिध्द केली आहे.
- शासन निर्णय क्रमांक जिपब-४१४/ प्र.क्र११२/ आस्था-१४ ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई ३२ दिनांक १५ मे २०१४ व ७ मार्च २०१९, मध्ये नमुद केल्या प्रमाणे विधवा , परितत्क्या असणाऱ्या स्त्रीकर्मचारी व आकस्मीत अपघाती घटने मुळे आजारी कर्मचारी , तसेच कॅन्सर ,टिबी , हृदय शस्त्रक्रीया , डायलेसिस , पक्षघात या गंभीर आजाराने आजारी असल्या बाबत जिल्हा शल्या चिकीत्सक यांचे प्रमाण पत्र सादर केले असल्यास त्या बाबत माहिती घेण्यात आली . तसेच प्रकरण १ मधिल ३(अ),(ब), (क),(ख) (ग)(घ) ४ (१ते५) व (४) मधिल तरतुदी नुसार कार्यवाही करणे बाबत सुचित केले. ज्याकर्मचा-यांचे जिल्हा शल्या चिकीत्सक यांचे प्रमाणपत्र नसेल त्यांची विनंती वरुण बदली मान्य केली जानार नाही.
- विनंती नुसार स्थानांतर पाहीजे असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती घेवुन रिक्त पदाची सुध्दा माहिती घेण्यात आली.
- प्रशासकिय बदली नंतर रिक्त असलेली पदे रिक्त दर्शविण्यात आली व प्रत्यक्ष बदली साठी सुरवात करण्यात आली.

त्यानंतर विनंती वरुन बदलीच्या यादी ची विकल्पानुसार प्रकरण १ मधिल १ मधिल ३(अ), (ब) , (क), (ख) (ग) (घ) ४ (१ते५) व (४) चे जेष्ठते क्रमा नुसार समुपदेशनाने ऑनलाईन Google Meet व्दारे समुपदेशनास सुरवात करण्यात आली.

खालील प्रमाणे प्रशासकिय प्रस्ताव ठेवण्यात आले.

| अ क्र | कर्मचा-याचे नाव | पदनाम | कालावधी | बदलीचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|

**पर्यवेक्षिका मंजुर पदे ४५ भरलेली पदे १२**

पर्यवेक्षिका या संवर्गामधे एकाच तालुक्यात मुख्यालयाच्या ठिकाणी एकुण १० वर्ष सेवा पुर्ण झालेल्या पर्यवेक्षिका कार्यरत नसल्याने शासन निर्णयानुसार पर्यवेक्षिका या संवर्गामध्ये प्रशासकिय बदल्या करण्यात आलेल्या नाहित.

**खालील प्रमाणे विनंतीवरुन प्रस्ताव ठेवण्यात आले.**

| अ क्र | कर्मचा-याचे नाव | पदनाम | कालावधी | बदलीचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती एस पी वाघ | पर्यवेक्षिका | ७ वर्ष ११ महिने | ---- | |
| २ | श्रीमती डि एस कांबळे | पर्यवेक्षिका | ७ वर्ष | ---- | |
| ३ | श्रीमती एस व्हि बोळे | पर्यवेक्षिका | ७ वर्ष | ---- | |

विनंतीवरुन प्रस्तावामध्ये अ क्र १ श्रीमती वाघ/फाले २.श्रीमती कांबळे ३. श्रीमती बोळे पर्यवेक्षिका यांचे अर्ज प्राप्त झाले. शासन निर्णयानुसार व तालुकानिहाय रिक्त पदाचा समतोल पाहता विनंतीनुसार पर्यवेक्षिका यांची बदल्या करण्याबाबतची ऑनलाईन Google Meet व्दारे विनंती मान्य करण्यात आलेली नाही. स्थानांतरण कार्यवाहीस सहकार्य केल्याबाबत सर्वाचे आभार मानुन महिला व बाल कल्याण विभागाची ऑनलाईन स्थानांतरण बाबतची कार्यवाही पुर्ण झाल्याचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) जिल्हा परिषद वाशिम यांनी सांगीतले.

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक)**
**जिल्हा परिषद वाशिम**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद वाशिम**